**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

**जाहीर सूचना**
**इमारतीचे संरचनात्मक परीक्षण अनिवार्य असल्याबाबत**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व निवासी व अनिवासी इमारतींचे मालक व भोगवटादार यांना या प्रकट निवेदनाद्वारे हे सुचित करण्यात येत आहे की, महाराष्ट्र शासनाने आपल्या दिनांक १४/०१/२००९ च्या महाराष्ट्र राज्य राजपत्रामध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसुचनेद्वारे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे एक नविन कलम क्र. २६५ अ अंतर्भुत केले असून त्यातील तरतूदीनुसार ज्या इमारतींचा वापर सुरु झाल्यापासून ३० वर्षे अथवा अधिक काळ लोटला आहे, अशा सर्व इमारतींचे ठाणे महानगरपालिकेकडे नोंदणी केलेल्या संरचना अभियंत्याकडून संरचनात्मक परीक्षण करुन घेणे अनिवार्य आहे. सदर तीस वर्षाचा काळ, इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र (पूर्ण अथवा आंशिक) मिळाल्याच्या दिवसापासून अथवा सदर इमारतीचे त्याच्या एकूण बांधीव क्षेत्रफळाच्या ५० टक्के (अथवा अधिक) क्षेत्रफळ वापराखाली आणले गेले अशा दिवसापासून मोजावयाचा आहे. नेमलेल्या संरचना अभियंत्याने शिफारस केलेली दुरुस्तीची कामे करुन घेऊन, त्यानंतर त्यांची पुर्तता व बांधकाम सुस्थितीचे प्रमाणपत्र ठाणे महानगरपालिकेकडे सादर करणे अनिवार्य आहे. याप्रकारे संरचना परीक्षण करण्याचे उत्तरदायित्व जी संस्था/मालक/भोगवटादार पार पाडण्यात टाळाटाळ करतील त्यांना किमान रुपये २५,०००/- अथवा सदर मिळकतीचे वार्षिक मालमत्ता कराची रक्कम यातील जी जास्त असेल, तितक्या रकमेचा दंड शिक्षेच्या रुपाने ठोठावण्याची तरतूदही या अधिनियमांच्या कलम ३९८ अ खाली अंतर्भूत करण्यात आली आहे.

सदर निवेदन सर्वसाधारण जनहिताच्या दृष्टीने प्रसृत केले आहेत. नागरीकांनी कृपया अधिक माहितीकरीता शासनाच्या सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ६ पाहावा.

ठाणे
दिनांक :-

(सही/-)
**श्री. नंदकुमार जंत्रे**
**महापालिका आयुक्त**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे**